# -:जाहीर सुचना:-

महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित ग्रामीण विभाग अमरावती अंतर्गत अधिनियम-१९६१ अन्वये सत्र २०२१-२०२२ करीता ऑनलाईन पध्दतीने खालील व्यवसायाकरीता शिकाऊ उमेदवारांची भरती करावयाची आहे.

विजतंत्री (Electrician)-३२, तारतंत्री (Lineman)-३२ व कोपा (COPA)-०५ = एकुण-६९

शैक्षणिक अर्हता : १) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ १०+२ बंधामधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, २) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून विजतंत्री, तारतंत्री व कोपा व्यवसायात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ३) वयोमर्यादा सर्वसाधारण उमेदवारासाठी किमान १८ वर्ष पुर्ण व कमाल ३० वर्ष असावे. राखीव उमेदवाराकरीता वयाची अट ०५ वर्षे शिथीलक्षम राहील, त्याकरीता उमेदवाराने राखीव गटातील जातीचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. ४) प्रशिक्षण कालावधी ०१ वर्षे असेल, ५) विद्यावेतन नियमाप्रमाणे मिळेल, ६) ऑनलाईन अर्ज करतांना एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिकामध्ये नमुद केलेले नांव व जन्मतारीख हे आधार कार्डवर नमुद असलेल्या नावाशी व जन्मतारखेशी सुसंगत असावे, तसेच सद्यास्थितीत कार्यान्वित असलेला ई-मेल आय.डी. व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन अचूक नमुद करावा. ७) आय.टी.आय. उत्तीर्ण प्रमाणपत्र व चारही सेमिस्टर गुणपत्रिका स्वःसाक्षांकीत करून या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. तेंव्हा अमरावती जिल्हयातील उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज **www.apprenticeshipindia.gov.in** या संकेतस्थळावर आय.डी. **E10162702274** या क्रमांकावरच करावा. ऑनलाईन अर्ज सादर करतांना शैक्षणिक मुळ प्रमाणपत्र सुस्पष्ट स्कॅन करून अपलोड करणे बंधनकारक असून त्याची एक प्रत कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि..कं.मर्या, अमरावती ग्रामीण विभाग मेजर स्टोअर संकुल पॉवर हाऊस, वेलकम पाईन्ट, अमरावती मोर्शी रोड, अमरावती येथे दि. २९/१०/२०२१ पर्यंत संध्याकाळी ५.३० पर्यंत सादर करावी. वरील कालावधीत Online व Offline अर्जाची प्रत सादर न केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि.कं.मर्या, अमरावती ग्रामीण विभाग,

**PRO No. 58**